


# अमेरिकेतील पहिल्या क्रमांकाची सेर्टा अल्ट्रा प्रीमियम मॅट्रेस आता भारतात उपलब्ध

अमेरिकेतील पहिल्या क्रमांकाच्या 'सेर्टा' या अल्ट्रा प्रीमियम मॅट्रेस ब्रॅण्ड च्या बाजारपेठेतील प्रवेशामुळे भारतीय मॅट्रेस बाजारपेठेत माठे बदल घडून येत आहे. संपूर्ण देशभरात सेर्टा फ्रॅन्चाईज शोरूम्स आणि डीलरर्सची सेवा सुरू केली जाणार असून याअंतर्गत मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, गुरगाव, इंदूर, सूरत, पुणे आणि अन्य महानगरे तसेच शहरातील ग्राहकांना लक्ष्य केले जाणार आहे.

दुबईतील दुबई फर्निचर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी एलएलसी (डीएफएमसी) ची भागधारक कंपनी असलेल्या भारतातील एमिरेट्स स्लीम सिस्टीम्स प्रा .लि. (ईएसपीएल) च्या मदतीने ही नवीन भागीदारी केली जात आहे. यूएसएमधील सेर्टा इन्क कडून

ईएसपीएलला उत्पादनाकरता तसेच सेर्टा ब्रॅण्डेड स्प्रिंग मॅट्रेस उत्पादने भारतात वितरित करण्याकरता परवाना मिळाला.

सेर्टाने भारतात १० कोटी रुपयांची गुंतवणूक सुरुवातीस केली असून मागणीनुसार पुढील गुंतवणुकीची योजना बनवली. भारतातील स्प्रिंग मॅट्रेस विभागासाठीची बाजारपेठ ६० कोटी रुपयांची असून एकूण बाजारपेठेचा आकार ८०० कोटी रु हून अधिक आहे. सेर्टा ला आपल्या ब्रॅण्डकरता बाजारपेठेत चांगली संधी दिसत आहे.

"सेर्टा हा अमेरिकेतील पहिल्या क्रमांकाचा मॅट्रेस ब्रॅण्ड आहे. याची सुरुवात १९३१ मध्ये उत्तर अमेरिकेत झाली असून याचे कॉर्पोरेट ऑफिस शिकागो मध्ये आहे. या ब्रॅण्डच्या समृद्ध परंपरेमुळे यूएसबाहेरील भागात जलदगतीने विकास होणे शक्य झाले आहे." असे सेर्टा इन्क यूएसएचे इंटरनॅशनल एमडी श्री. रॉबर्ट एडवर्ड मेलिन यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, या ब्रॅण्डने सातत्याने लक्षणीय विकास केला असून आंतरराष्ट्रीय मॅट्रेस उद्योगावर परिणाम केला आहे. "आज सेर्टा ची यूएसएमध्ये २७ उत्पादकेंद्रे असून जगभरात ३७ ठिकाणी आहेत. यापैकी दुबई आणि भारतातील पुणे ही दोन ठिकाणे सेर्टाच्या नकाशावर अद्ययावत आहेत." त्यांनी पुढे सांगितले.

दरदिवसाला २०० मॅट्रेसचे उत्पादन करण्याची ईएसपीएलची क्षमता आहे. योग्य वेळी दोन नवीन फॅक्टरी उत्तर भारत आणि दक्षिण भारत येथे सुरू करण्याची योजना आहे.

दुबईतील शोपीस प्रकल्पासह सेर्टाने मध्य पूर्व बाजारपेठेत आघाडीचे स्थान मिळवले आहे. यूएईमध्ये आपल्या कामाची २० वर्षे साजरी करताना सेर्टा ने दिवसाला केवळ २० मॅट्रेस तयार करण्यापासून सुरुवात केली. २,००,००० चौरस फूटावर पसरलेल्या दुबई इन्व्हेस्टमेंट पार्कमध्ये आज दिवसाला ८०० ते १००० प्रिमियम आणि अल्ट्रा प्रिमियम मॅट्रेसेस तयार करण्याची यांची क्षमता आहे.

"आज भारतातील मॅट्रेस उद्योग लघु आणि असंघटित क्षेत्राने व्यापलेला असून काथ्या, कापूस आणि फोम मॅट्रेसची चलती असून यामुळे भारतातील ९० टक्क्यांहून अधिक मॅट्रेसची गरज पूर्ण होत आहे. सध्या स्प्रिंग मॅट्रेस विभागात दर्जेदार उत्पादक नसून यामुळे या विभागातील विकास खूपच मंदावला आहे," असे ईएसपीएलचे कार्यकारी संचालक श्री. एस सुंदर रंजन यांनी सांगितले.

'मी टू' ब्रॅण्ड्सपासून सेर्टाचे वेगळेपण दिसून येते ते पोश्चर स्पायरल स्प्रिंग टेक्नॉलॉजी, ॲडव्हान्स कम्फर्ट क्विल्ट टेक्नॉलॉजी, युनिक मेगा फोम टेक्नॉलॉजी (हानीकारक रसायनांचा वापर न करता) आणि प्रिमियम यूफोलस्टेरी यांचा समावेश आहे. सेर्टा कडे २५ पेटंटसहीत ८० हून अधिक वर्षांचा मॅट्रेस उत्पादनाचा अनुभव आहे.

भारतातील रिटेल ऑपरेशन्सकरता सेर्टाने भारतात मॅट्रेसेसच्या वितरणाकरता फ्रॅन्चायजी रिटेल संकल्पना स्वीकारली. सध्या सेर्टा मुंबई, पुणे, अहमदाबाद, सूरत, दिल्ली, गुरगाव आणि इंदूर येथील ९ फ्रॅन्चाईज्ड आउटलेटमध्ये उपलब्ध आहे.

सेर्टाच्या वतीने आदरातिथ्य विभागाला मॅट्रेसेस पुरवली जात असून ग्रॅण्ड हयात (मुंबई), हिल्टन (चेन्नई), हयात रिजन्सी (पुणे), हयात रिजन्सी (दिल्ली), मॅरिएट हॉटेल आणि कन्व्हेन्शन सेंटर (पुणे), डबल ट्री बाय हिल्टन (बंगलोर आणि गुरगाव) यासारख्या महत्त्वपूर्ण हॉटेल्सबरोबर काम केले जाते.




ईएसपीएलचे कार्यकारी संचालक श्री. एस सुंदर रंजन पुढे म्हणाले, "सेर्टा ने भारतात पुण्याजवळील जेजुरी येथे सुसज्ज फॅक्टरी स्थापन केली असून येथे दिवसाला २०० मॅट्रेसेसचे उत्पादन केले जाते. मध्य पूर्वेतील अनुभव जमेस धरता विपणन कौशल्य आणि डीएफएमसीची तांत्रिक माहिती यांच्या आधारे भारतीय बाजारपेठेत दर्जेदार उत्पादने उत्पादित केली जातात."

भारत ही अत्यंत गुंतागुंतीची बाजारपेठ आहे. मॅट्रेस उद्योगाचा उदय झालेला नाही, स्प्रिंग मॅट्रेस विभाग अजून स्थापन व्हायचा आहे आणि मॅट्रेसचे महत्त्व आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम यांबाबत ग्राहकाला अजूनही अज्ञान आहे. "भारतात आम्हाला कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे याची आम्हाला साधारण माहिती आहे. आणि या सर्व समस्यांवर यशस्वी उपाययोजना करून ब्रॅण्ड स्थापित करण्याची आमची योजना आहे," असे श्री. एस सुंदर रंजन यांनी सांगितले.

सेर्टा ही भारतात २२ आकर्षक मॉडेल्समध्ये उपलब्ध असून याची किंमत २८,००० ते १ लाख रुपयांदरम्यान आहे. मॉडेलनुसार या मॅट्रेससची वॉरंटी ३ ते १० वर्षे इतकी असते.

सेर्टा ने नुकतीच सुरक्षित ऑनलाईन शॉपिंग सिस्टीम स्थापित केली असून येथे भारतीय ग्राहक आपल्या आवडीप्रमाणे आणि दर्जाप्रमाणे आकर्षक मॅट्रेस खरेदी करू शकतात आणि कोणतेही अतिरिक्त शिपिंग चार्ज न लावता त्यांच्या दारापर्यंत डिलिव्हरी होऊ शकते. सेर्टाने ऑनलाईन स्टोअर्समध्ये खरेदी करणाऱ्या या ग्राहकांकरता आदर्श अशी पॉईंट सिस्टीम सुरू केली आहे. या पॉईंट सिस्टीममध्ये ग्राहक आणि विक्रेता दोघांनाही लाभ होत असून यातून मिळणारे पॉईंट्स भविष्यात रिडीम करता येऊ शकतात.

सेर्टा भारतीय ग्राहकांना झोपेचा अनोखा अनुभव देत असून आरामदायी फील मिळतो. रिटेल ग्राहक आणि आदरातिथ्य विभाग, इस्पितळे आणि हॉटेल अपार्टमेंट यांना सेर्टा रेंजपासून लाभ होईल.